छान छान गोष्टींचीं पुस्तकें

मूल्य प्रत्येकी २५ नवे पैसे

जादूगाराचें बेट	अरबस्तानची परी
जादूची जत्रा	भाग १ ला मूल्य २५ नये पैसे
भुतांचा वाडा	भाग २ रा ५० नये पैसे
एक होती परी	सोन्याचे सूत
टेकडीवरील राक्षस	वेडा गणू
नागमणी	गुप्त खजिना
जादूची बाहुली	राक्षसाचा खजिना
राक्षसाची देणगी	गाणारा पक्षी

नागराणी जादूची बांगडी जादूचा महाल

आमचीं धार्मिक प्रकाशनें

पंचरत्नगीता	७५ नवे पैसे.	पंचरत्न हरीपाठ	५० नये पैसे
रामरक्षा	२५ ,, ,,	मारुती स्तोत्र	१२ ,, ,,
भोळा सोमवार	,, ,, ,,	गणपती स्तोत्र	१२ ,, ,,
शनी महात्म्य	,, ,, ,,	व्यंकटेश स्तोत्र	२५ ,, ,,
श्री मनाचे श्लोक	,, ,, ,,	मंगलाष्टके	२० ,, ,,
अकरावा अध्याय	,, ,, ,,	आरती संग्रह	२५ ,, ,,
ज्ञानदेव हरीपाठ	,, ,, ,,	पाळणे संग्रह	२५ ,, ,,

उखाणें म्हणी २५ नवे पैसे.

सेंट्रल प्रकाशन मुंबई नं. ४

वैभव

to be quoted



किंमत ७ नये पैसे

कथासार

अण्णासाहेब मोद्यांची मी कन्या. माझं नांव मालती मला एक स्वाभिमानी, हुशार असा वडिल भाऊ आहे. त्याचं नांव रवी आणि माझी शांत स्वभावाची आई. इन मिन तीन माणसां च आमचं कुटुंब. अण्णा हयात असतांना आम्हाला कशाचीच ददात पडली नाहीं. श्रीमंतीचं वैभव खूब भोगलं आम्हीं. अकल्पित धंद्यांत ठोकर बसली, त्या धक्कानं अण्णा गेले. त्यांच्यां बरोबर वैभव ही गेलें.

राहती सुंदर जागा सोडून एका चाळींत आम्हीं राह्यला आलों. वडिलांच्यां साऱ्या कर्जांची जबाबदारी माझ्या दादाने आपल्या शिरावर घेतली. देणे करी दारांत येऊ लागले पदोपदीं अपमान होऊ लागला दादाचा. त्याने कालेज सोडलें. वामन-रावांच्या किराणा मालाच्या दुकानांत नोकरी धरली. त्यातच तो माझ्या लग्नाची काळजी करूं लागला. खरं म्हणजे त्याचं वयं लग्नाचं. तें सरत चाललं होतं. आमच्या घराण्याचा पूर्वीचा लौकिक पाहून चांगल्या चांगल्या मुली त्याला सांगुन येतं होत्या पण माझं लग्न झाल्याशिवाय स्वतः बद्दल तो विचारच करायला तयार नव्हता.

पुढील भाग पडद्यावर पहा

◀ रसिक चित्र ▶

डायरेक्टर—कमलाकर तोरणे ▲ संगीत—राम कदम

कलाकार—रमेश देव; सीमा; ललिता देसाई, साळवी वसंत शिंदे

कवि—ग. दि. माडगुळकर

वैभव मधील गाणीं

—१—

आज जाहला श्वास मोकळा कोष व्यथांचे तुटले
पंख जिण्याला फुटले
मीच गाउनी मजसी रमविन
काडी काडी कण कण जमविन
उभारीन तें घरकुल ज्याला दैवें विसकटलें १
थकल्या तोंडीं घालिन चारा।
शिणल्या शरिरा ऊब निवारा।
जगविन सारे जीव प्रीतिचे जिवां जे विटले २
तुटल्या आशा पुन्हा सांधविन
हलत्या फांदीवरी नांदविन
घर दुबळ्याचें दिसेल जगतां आनंदे नटले ३

—२—

तो—माळावरून हिंडे वारा भरीत शीळ
चमके तळें जळाचें पाचूंत इन्द्र नीळ
चित्तास लोभवीतें हें चित्र ने अमोल

मज सांग साजणी तू झालीस कां अबोळ
ती—तू पाहसी निसर्गा मी पाहतें तुलारे
बोलू नये मुलींनी तें अंतरीं फुलारे
श्रीमंत श्रावणाची पायीं अजून ओल
वर केशरांत न्हाला अपरेस सूर्य गोल
मज सांग साजणा तू झालास का अबोळ
तो—बोलाविना कळाली माझी तुझी मनीषा
लज्जा सुहास्य यांची ही वेगळीच भाषा
दोन्हीं मनें मिळालीं शब्दास काय मोल
ती—मज सांग साजणा तू झालास का अबोल
तो—मज सांग साजणी तू झालीस कां अबोळ

—३—

अबोल झालिस काय साजणी
आज जिवांची जुळलीं गाणी
मुक्या कळीला शिवे पाखरूं
नकोस आतां सुगंध चोरू
पहा मजकडे उघड पापणी १
बाग धुंडिली मी तुज साठीं
लाभलीस मज सखे शेवटी
हास मोकळें गे मधुराणी २

दास तुझा मी नव्हे सोबती
गुंगत र हिन तुझ्या भोवती
तहानें तू मज तूची पाणी ३

—४—

Lyricism melodi... गीतलता

तो--नाकांत वाकडा नथीचाँ आकडा
मोत्याचं कुलूप ओठांच्या कवाडा
बंदोबस्त कां ग केलास एवढा
ती--बोलांचं माणिक हंसण्याच हिरक लता
रत्नांनी भरला रुपाचा वाडा
तुझ्या वाणी वेडा घालिल दरोडा
बंदोबस्त केला म्हणुन येवढा
तो—येऊन गुपचुप तोडिन कुलूप
ती--भलतेंच नकोरे बोलू उनाडा
तो--नाकांत वाकडा नथीचा आकडा
मोत्याचं कुलूप ओठांच्या कवाडा
बंदोबस्त कां ग केलास एवढा
ती—बोलांचं माणिक हसण्याचं हिरक
रत्नांनी भरला रुपाचा वाडा
तुझ्या वाणी वेडा घालिल दरोडा
बंदोबस्त केला म्हणुन एवढा

तो-घालिन दरोडा धुंडिन वाडा
तो-पायात पडेल र जन्माचा खोडा
तो-सोशिन खोडा हवा तेवढा
आधीच कशाला तंटा बखेडा
तुझा माझा जोडा पायीं घाल खोडा
अंगणी झडूं दे सनई चौघडा

+ Record (...) —५— ✓ माहेरची आठवण

चांद किरणानो जारे माझ्या माहेरा
फुलें प्रकाशाचीं माझ्या दारीं अंथरा

हळू चढा खिडकींत पहा डोकाउनी आंत
मूर्त माउळीची माझ्या न्याहाळा जरा

पाडसांची चिंता माथीं करीं विरक्तीची पोथी
डोळ्यांतुनि आसवांचा पाझरे झरा

टांगलेलें छाया चित्र देवासारखें पवित्र
स्वर्गवासी माझे बाबा रक्षिती घरा

पलीकडे खाटेवरी भर मध्यान्हीच्या पारी
दिव्यातळीं भाउराया वाचि अक्षरा

—६—

निराश एक भावना अंतरांत कोंदते
मिटुन ओठ मी तरी वैभवांत नांदतें
देत देत हुंदका...

सासरांत संपदा भरित माप राहते
दूर वृद्ध माउली आपदेंत नाहते
देत देत हुंदका.. ...

भरजरी नवीन मी वस्त्र रोज नेसतें
आरशांत पाहतां मी मलाच हासते
देत देत हुंदका......

पति म्हणुन मानिला त्यास प्रीत वाहते
पावसांत मी परी कोरडीच राहतें
देत देत हुंदका.. ...

प्रकाशक-एफ. बी. बुरहानपूरवाला, सेंट्रल प्रकाशन
सिपलेक्स बिल्डिंग; पायवाला स्ट्री ; न्यू चर्निरोड, बंबई ४
मुद्रक—सज्जाद हुसेन कुर्बान हुसेन
बाकीर प्रिंटिंग प्रेस, मुझफराबाद हॉल, ग्रँट रोड बंबई ७